शुद्धीपत्रके

असा. क्र. १२

रजिस्टर्ड नं. एमएच/बाय-साऊथ/२०

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

सोमवार, जानेवारी १३, १९९७/पौष २३, शके १९१८

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

अनुक्रमणिका

पृष्ठे

**सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११.**—महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम, १९९६ यात सुधारणा करण्याकरिता अधिनियम. .. १२२–१२४

दिनांक ९ जानेवारी १९९७ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रतिमा उमरजी,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

### सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११.

[राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक १३ जानेवारी १९९७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.]

**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम, १९९६ यात सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९९६ चा महा. १५. १९९६ चा महा. अध्या. १८. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम, १९९६, यात सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तावडतोब कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री पटली होती ; आणि म्हणून, त्यांनी दिनांक २९ ऑक्टोबर १९९६ रोजी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ (सुधारणा) अध्यादेश, १९९६ प्रख्यापित केला होता ;

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सत्तेचाळिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ (सुधारणा) अधिनियम, १९९६ असे म्हणावे.

(२) तो दिनांक २९ ऑक्टोबर १९९६ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम ४ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम, १९९६ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ४ मध्ये,— १९९६ चा महा. १५.

(एक) पोट-कलम (१) मध्ये, खंड (अ) च्या नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(अ-१) शासनाने नियुक्त करावयाचे दोन अशासकीय सदस्य. उपाध्यक्ष ";

(दोन) पोट-कलम (३) मध्ये, "खंड (म)" या मजकुराऐवजी, "खंड (अ-१) आणि (म)" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९९६चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम ७ ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मध्ये, पोट-कलम (२) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(२) अध्यक्ष किंवा त्याच्या अनुपस्थितीत, कलम ४ चे पोट-कलम (१) याच्या खंड (अ-१) अन्वये नियुक्त केलेले दोन्ही उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचे सदस्य असतील तर, त्यांच्यापैकी, अध्यक्षाकडून आदेशान्वये पूर्व-निर्धारित करण्यात येईल असा उपाध्यक्ष महामंडळाच्या बैठकीत अध्यक्ष म्हणून काम पाहील, आणि तिघांच्याही अनुपस्थितीत अन्य उपाध्यक्ष असलेला शासनाचा मुख्य सचिव अशा बैठकीत अध्यक्ष म्हणून काम पाहील:

परंतु, खंड (अ-१) अन्वये नियुक्त केलेले उपाध्यक्ष जर राज्य विधानमंडळाच्या सदस्यांव्यतिरिक्त अन्य व्यक्ती असतील तर, उपाध्यक्ष म्हणून मुख्य सचिव अध्यक्षांच्या अनुपस्थितीत, बैठकीत अध्यक्ष म्हणून काम पाहील आणि मुख्य सचिवाच्या अनुपस्थितीत अध्यक्षाकडून आदेशान्वये पूर्व-निर्धारित करण्यात येईल असा दुसरा उपाध्यक्ष अशा बैठकीत काम पाहील."

सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम ६५ची सुधारणा.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम ६५ मध्ये, "उपाध्यक्ष" या मजकुराऐवजी "तिन्ही उपाध्यक्ष" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम ७० ची सुधारणा.

५. मुख्य अधिनियमाच्या कलम ७० च्या पोट-कलम (१) ऐवजी पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(१) ज्या प्रयोजनांसाठी या अधिनियमाअन्वये महामंडळाची स्थापना करण्यात आली होती ती प्रयोजने मुख्यत: साध्य झाली असल्याबद्दल राज्य शासनाची खात्री पटली असेल व त्यामुळे राज्य शासनाच्या मते महामंडळ अस्तित्वात असण्याचे चालू ठेवणे अनावश्यक असेल त्याबाबतीत शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून महामंडळ विसर्जित होईल असे घोषित करता येईल व तदनुसार महामंडळ विसर्जित झाले असल्याचे मानण्यात येईल आणि अशा विसर्जनानंतर मंडळाचे सर्व सदस्य व पदाधिकारी आपापली पदे रिकामी करतील ".

१९९६ चा महा.अध्या. १८. सन १९९६चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १८ - चे निरसन व व्यावृत्ती.

६. (१) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ (सुधारणा) अध्यादेश, १९९६ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा करण्यात आलेली कोणतीही कार्यवाही ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाअन्वये करण्यात आलेली गोष्ट किंवा, यथास्थिति, कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

(2) VIDC - ammendment

असा क्र. ६ रजिस्टर्ड नं. एमएच/एमबीआय-साऊथ/२०/९९

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शनिवार, जानेवारी १६, १९९९ पौष २६, शके १९२०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६.—विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ यात सुधारणा करण्यासाठी अधिनियम. .. .. पृष्ठे ४९–५३

दिनांक १५ जानेवारी १९९९ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

प्रतिमा उमरजी,
सचिव,
विधी व न्याय विभाग.

### सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६.

[राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक १६ जानेवारी १९९९ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.]

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ यात सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी**, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

१९९७ चा महा. २६. १९९८ चा महा. अध्या. १५. **आणि ज्याअर्थी**, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ यात सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी त्वरित कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री झाली होती; आणि म्हणून, दिनांक २३ नोव्हेंबर १९९८ रोजी त्यांनी विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ (सुधारणा) अध्यादेश, १९९८ प्रख्यापित केला होता;

**आणि ज्याअर्थी**, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या एकोणपन्नासाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ (सुधारणा) अधिनियम, १९९८ असे म्हणावे. **संक्षिप्त नाव व प्रारंभ.**

(२) तो दिनांक २३ नोव्हेंबर १९९८ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम ३१ ची सुधारणा.

२. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३१ च्या पोट-कलम (१) मध्ये,— १९९७ चा महा. २६.

(अ) "१३०० कोटींपेक्षा" या मजकुराऐवजी "२२४५ कोटींपेक्षा" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ब) "पाच वर्षांच्या" या मजकुराऐवजी "दहा वर्षांच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या मूळ अनुसूचीऐवजी नवीन अनुसूची दाखल करणे.

३. मुख्य अधिनियमाच्या अनुसूचीऐवजी पुढील अनुसूची दाखल करण्यात येईल :—

"अनुसूची

[कलमे १(२) आणि २(अ) पहा]

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ ज्याला लागू होतो, ते क्षेत्र

पुढील प्रत्येक पाटबंधारे प्रकल्पासमोर विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या जिल्ह्यांच्या भौगोलिक सीमांमध्ये येणारे पाटबंधारे प्रकल्पांचे पाणलोट क्षेत्र, पाण्याखालील क्षेत्र व लाभ क्षेत्र :—

| अनुक्रमांक (१) | प्रकल्पाचे नाव (२) | प्रकल्पामध्ये येणारे जिल्हे (३) |
|---|---|---|
| | **मोठे प्रकल्प—** | |
| १ | गोसिखुर्द | भंडारा, चंद्रपूर, नागपूर |
| २ | धापेवाडा टप्पा–१ | भंडारा |
| ३ | लोअर वर्धा | वर्धा |
| ४ | हुमण | चंद्रपूर |
| ५ | लोअर वेण्णा | नागपूर, वर्धा |
| ६ | अप्पर वर्धा | अमरावती, वर्धा |
| ७ | बेंबळा | यवतमाळ |
| ८ | वाण | बुलढाणा, अकोला |
| ९ | खडकपूर्णा | बुलढाणा |
| १० | तुळतुळी | गडचिरोली |
| ११ | अरुणावती | यवतमाळ |
| १२ | बावनथडी | भंडारा |
| १३ | लोअर पेनगंगा | यवतमाळ |
| १४ | जीगाव | बुलढाणा |
| | **मध्यम प्रकल्प—** | |
| १ | चेन्नानदी | गडचिरोली |
| २ | करवप्पानाला | गडचिरोली |

अनुसूची–चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ३ | डोंगरगाव | चंद्रपूर |
| ४ | पकाडीगुड्डम | चंद्रपूर |
| ५ | वाघोलीबुट्टी | चंद्रपूर |
| ६ | सोनापूरतोमता | चंद्रपूर |
| ७ | जाम | नागपूर |
| ८ | कार | नागपूर |
| ९ | सायाकी | नागपूर |
| १० | वेंढारी | नागपूर |
| ११ | धाम | वर्धा |
| १२ | लालनाला | वर्धा |
| १३ | मादन | वर्धा |
| १४ | उमरझरी | भंडारा |
| १५ | सोंडयाटोला | भंडारा |
| १६ | लोअर चुलबंद | भंडारा |
| १७ | कटंगी | भंडारा |
| १८ | कारंजखेड | भंडारा |
| १९ | काळपाथरी | भंडारा |
| २० | चंद्रभागा | अमरावती |
| २१ | पूर्णा | अमरावती |
| २२ | नारणगाव | यवतमाळ |
| २३ | पेनटाकळी | बुलढाणा |
| २४ | उतावळी | बुलढाणा |
| २५ | मूम | बुलढाणा |
| २६ | तोरणा | बुलढाणा |
| २७ | वडाण (पिंपरी) | अकोला |

लहान पाटबंधारे प्रकल्प

| | | |
|---|---|---|
| १ | ब्राम्हणवाडा | बुलढाणा |
| २ | घोरपगाव | बुलढाणा |
| ३ | कागई | बुलढाणा |
| ४ | मसरूळ | बुलढाणा |
| ५ | सावखेडभोई | बुलढाणा |
| ६ | विद्रुप | बुलढाणा |
| ७ | व्याघ्रनाला | बुलढाणा |
| ८ | अडोल | अकोला |
| ९ | मोहगव्हाण | अकोला |
| १० | नेतानसा | अकोला |
| ११ | पोपटखेडा | अकोला |
| १२ | शिवण (खुर्द) | अकोला |
| १३ | अपर मोर्णा | अकोला |
| १४ | विश्वामित्री | अकोला |

अनुसूची—समाप्त

| (१) | (२) | (३) |
| --- | --- | --- |
| १५ | आसोली | भंडारा |
| १६ | बंदरचूहा | भंडारा |
| १७ | भिमलकसा | भंडारा |
| १८ | नरटोला | भंडारा |
| १९ | निमगाव | भंडारा |
| २० | पोलंडूर | भंडारा |
| २१ | सातबहिणी | भंडारा |
| २२ | सुंदरी | भंडारा |
| २३ | उपसीयनाला | भंडारा |
| २४ | मुरडोली | भंडारा |
| २५ | मिडकेपर | भंडारा |
| २६ | वर्टोला | भंडारा |
| २७ | ओवरा | भंडारा |
| २८ | भासबोरन | चंद्रपूर |
| २९ | जामखुर्द | चंद्रपूर |
| ३० | भादगनाला | चंद्रपूर |
| ३१ | खुमरीनाला | नागपूर |
| ३२ | उंदरीनाला | नागपूर |
| ३३ | चिखलीनाला | नागपूर |
| ३४ | जावळी | नागपूर |
| ३५ | सावंगीनाला | नागपूर |
| ३६ | शिरसीनाला | नागपूर |
| ३७ | ठाणा | नागपूर |
| ३८ | सुकळी | वर्धा |
| ३९ | धुमीनाला | गडचिरोली |
| ४० | हुरकण गूदरा | गडचिरोली |
| ४१ | गौगाव | गडचिरोली |
| ४२ | रेगडी विकासपल्ली लार्जर | गडचिरोली |
| ४३ | चरगड | अमरावती |
| ४४ | खेरकुंड | अमरावती |
| ४५ | खमकुंड | यवतमाळ |
| ४६ | मांजरा | यवतमाळ |
| ४७ | अमदापूर | यवतमाळ |
| ४८ | जांबनळा | यवतमाळ |
| ४९ | कुंभारकिणी | यवतमाळ |
| ५० | नेर | यवतमाळ |
| ५१ | पिंपळगाव | यवतमाळ |
| ५२ | शिरसगाव | यवतमाळ |
| ५३ | वर्धा | यवतमाळ |
| ५४ | वरूड | यवतमाळ |
| ५५ | वाई | यवतमाळ.". |

१९९८ चा महाराष्ट्र अध्यादेश १५.

४. (१) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ (सुधारणा) अध्यादेश, १९९८ हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

सन १९९८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १५ याचे निरसन व व्यावृत्ती.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमाद्वारे केलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई ही, या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाद्वारे केलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई असल्याचे मानण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

③ VIDC/KIDC/TIDC/GMIDC/ ammendment

असा. क्र. ४२ रजिस्टर्ड नं. एमएच/एमबीआय-साऊथ/२०/२०००

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

**प्राधिकृत प्रकाशन**

गुरुवार, मे ४, २००० /वैशाख १४, शके १९२२

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

**अनुक्रमणिका**

पृष्ठे

**सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१.**—विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७, महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ आणि महाराष्ट्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९८ यांत आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. . . . . . २५५–२५७

दिनांक ३ मे २००० रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रतिमा उमरजी,**
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन
विधी व न्याय विभाग.

### सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ४ मे २००० रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७, महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ आणि महाराष्ट्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९८ यांत आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७, महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ आणि महाराष्ट्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९८ यांत आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एकावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१९९७ चा महा. २६. १९९८ चा महा. ३. १९९८ चा महा. ४. १९९८ चा महा. २३.

संक्षिप्त नाव. **१.** या अधिनियमास, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ आणि महाराष्ट्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ (सुधारणा) अधिनियम, २००० असे म्हणावे.

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम ३१ ची सुधारणा. **२.** विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ याच्या कलम ३१ मधील, पोट-कलम (१) मध्ये, " २२४५ कोटींपेक्षा " या मजकुराऐवजी " ३३३५ कोटींपेक्षा " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९९७ चा महा. २६.

सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३१ ची सुधारणा. **३.** कोकण पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ याच्या कलम ३१ मधील, पोट-कलम (१) मध्ये, " २७३ कोटींपेक्षा " या मजकुराऐवजी " ४२८ कोटींपेक्षा " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९९८ चा महा. ३.

सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ३१ ची सुधारणा. **४.** महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ याच्या कलम ३१ मधील, पोट-कलम (१) मध्ये, " १४०० कोटींपेक्षा " या मजकुराऐवजी " २३३७ कोटींपेक्षा " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९९८ चा महा. ४.

१९९८ चा महा. २३. ५. महाराष्ट्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९८ याच्या कलम ३१ मधील, पोट-कलम (१) मध्ये, " १३०० कोटींपेक्षा " या मजकुराऐवजी " १९५० कोटींपेक्षा " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ याच्या कलम ३१ ची सुधारणा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.

(४)  UIDC/KIDC/TIDC  amendment

असा. क्र. ३२  रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००१

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शनिवार, एप्रिल २१, २००१/वैशाख १, शके १९२३

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम

## अनुक्रमणिका

पृष्ठे

सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८.—विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ आणि महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७, यांत आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम .. .. २००-२०४

दिनांक २१ एप्रिल २००१ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रतिमा उमरजी,**
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८.

(राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक २१ एप्रिल २००१ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ आणि महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७, यांत आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

२००० चा महा. अध्या.२४. **ज्याअर्थी**, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ आणि महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ (सुधारणा) अध्यादेश, २००० (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अध्यादेश " असा करण्यात आला आहे), हा, दिनांक २४ ऑक्टोबर २००० रोजी प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** दिनांक २७ नोव्हेंबर २००० रोजी राज्य विधानमंडळाच्या पुन्हा सुरु झालेल्या अधिवेशनात, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करण्यासाठी, सन २००० चे विधानसभा विधेयक क्रमांक ७६ हे महाराष्ट्र विधानसभेमध्ये दिनांक ३० नोव्हेंबर २००० रोजी सादर करण्यात आले होते. तथापि, राज्य विधानमंडळाच्या अधिवेशनाची दिनांक १५ डिसेंबर २००० रोजी सत्रसमाप्ती झाल्यामुळे उक्त विधेयक संमत होऊ शकले नाही ;

**आणि ज्याअर्थी,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (क) च्या तरतुदीप्रमाणे राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा सुरु झाल्याच्या दिनांकापासून सहा आठवड्यांचा कालावधी संपल्यानंतर, म्हणजेच ७ जानेवारी २००१ या दिनांकानंतर, उक्त अध्यादेश अंमलात असणे बंद झाले असते ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात राहणे चालू ठेवणे इष्ट वाटले ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात ठेवण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी ताबडतोब कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि म्हणून उक्त अध्यादेश मागे घेऊन व त्याचे निरसन करून, पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजेच दिनांक २४ ऑक्टोबर २००० पासून त्यांनी विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ आणि महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ (सुधारणा व चालू ठेवणे) अध्यादेश, २००१ हा दिनांक ६ जानेवारी २००१ प्रख्यापित केला होता ; २००१ चा महा. अध्या. २

**आणि ज्याअर्थी,** विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ आणि महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ (सुधारणा व चालू ठेवणे) अध्यादेश, २००१, याचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बावन्नाव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :— २००१ चा महा. अध्या. २.

## प्रकरण एक
### प्रारंभिक

संक्षिप्त नाव व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ आणि महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ (सुधारणा व चालू ठेवणे) अधिनियम, २००१ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २४ ऑक्टोबर २००० रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

## प्रकरण दोन
### विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ याची सुधारणा

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २६ याच्या कलम ४ ची सुधारणा. **२.** विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ (यापुढे या प्रकरणामध्ये, ज्याचा निर्देश " विदर्भ पाटबंधारे महामंडळ अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ४ मध्ये,— १९९७ चा महा. २६.

(अ) पोट-कलम (१) मधील, खंड (ब) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(ब) राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे विदर्भ प्रदेशातील दोन अशासकीय सदस्य. उपाध्यक्ष ;";

(ब) पोट-कलम (३) मधील, "खंड (न)" या मजकुराऐवजी "खंड (ब) आणि (न)" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

३. विदर्भ पाटबंधारे महामंडळ अधिनियमाच्या कलम ७ मधील, पोट-कलम (२) ऐवजी पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :— सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम ७ ची सुधारणा

"(२) अध्यक्ष किंवा त्याच्या अनुपस्थितीत, कलम ४ चे पोट-कलम (१) याच्या खंड (ब) अन्वये नियुक्त करण्यात आलेले दोन्ही उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचे सदस्य असतील तर, त्यांच्यापैकी अध्यक्षाकडून आदेशाद्वारे पूर्वनिर्धारित करण्यात येईल असा उपाध्यक्ष महामंडळाच्या बैठकीत अध्यक्ष म्हणून काम पाहील, आणि या तिघांच्याही अनुपस्थितीत, अन्य उपाध्यक्ष असलेला शासनाचा मुख्य सचिव, अशा बैठकीचा अध्यक्ष म्हणून काम पाहील :

परंतु, खंड (ब) अन्वये नियुक्त केलेले उपाध्यक्ष जर राज्य विधानमंडळाच्या सदस्यांव्यतिरिक्त अन्य व्यक्ती असतील तर, अध्यक्षाच्या अनुपस्थितीत, उपाध्यक्ष म्हणून असलेला मुख्य सचिव बैठकीत अध्यक्ष म्हणून काम पाहील आणि मुख्य सचिवाच्या अनुपस्थितीत, अध्यक्षाकडून आदेशाद्वारे पूर्वनिर्धारित करण्यात येईल त्याप्रमाणे दुसरा उपाध्यक्ष अशा बैठकीचा अध्यक्ष म्हणून काम पाहील .".

४. विदर्भ पाटबंधारे महामंडळ अधिनियमातील कलम ६५ मध्ये, समास टीपेसह येणाऱ्या, "उपाध्यक्ष" या मजकुराऐवजी "तिन्ही उपाध्यक्ष" हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम ६५ ची सुधारणा.

## प्रकरण तीन

## कोकण पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ याची सुधारणा

१९९८ चा महा. ३. ५. कोकण पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ (यापुढे या प्रकरणामध्ये, ज्याचा निर्देश "कोकण पाटबंधारे महामंडळ अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ४ मधील,— सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ४ ची सुधारणा.

(अ) पोट-कलम (१) मधील, खंड (ब) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(ब) राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे कोकण प्रदेशातील दोन अशासकीय सदस्य. उपाध्यक्ष ; ";

(ब) पोट-कलम (३) मध्ये, "सदस्याला" या मजकुराऐवजी "सदस्यांना" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ७ ची सुधारणा.

६. कोकण पाटबंधारे महामंडळ अधिनियमाच्या कलम ७ मधील, पोट-कलम (२) ऐवजी पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(२) अध्यक्ष किंवा त्याच्या अनुपस्थितीत, कलम ४ चे पोट-कलम (१) याच्या खंड (ब) अन्वये नियुक्त करण्यात आलेले दोन्ही उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचे सदस्य असतील तर, त्यांच्यापैकी अध्यक्षांकडून आदेशाद्वारे पूर्वनिर्धारित करण्यात येईल असा एक उपाध्यक्ष महामंडळाच्या बैठकीत अध्यक्ष म्हणून काम पाहील ; आणि या तिघांच्याही अनुपस्थितीत, अन्य उपाध्यक्ष असलेला, शासनाचा मुख्य सचिव, अशा बैठकीचा अध्यक्ष म्हणून काम पाहील :

परंतु, खंड (ब) अन्वये नियुक्त करण्यात आलेले उपाध्यक्ष, राज्य विधानमंडळाच्या सदस्यांव्यतिरिक्त अन्य व्यक्ती असतील तर, अध्यक्षाच्या अनुपस्थितीत, उपाध्यक्ष म्हणून असलेला मुख्य सचिव, बैठकीत अध्यक्ष म्हणून काम पाहील आणि मुख्य सचिवाच्या अनुपस्थितीत, अध्यक्षाकडून आदेशाद्वारे पूर्वनिर्धारित करण्यात येईल त्याप्रमाणे, दुसरा उपाध्यक्ष अशा बैठकीचा अध्यक्ष म्हणून काम पाहील .".

सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ६५ ची सुधारणा.

७. कोकण पाटबंधारे महामंडळ अधिनियमातील कलम ६५ मध्ये, समास टीपेसह येणाऱ्या, " उपाध्यक्ष " या मजकुराऐवजी, " तिन्ही उपाध्यक्ष " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## प्रकरण चार

## महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ याची सुधारणा

सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ४ ची सुधारणा.

८. महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ (यापुढे या प्रकरणात ज्याचा निर्देश " तापी पाटबंधारे महामंडळ अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ४ मधील,— १९९८ चा महा. ४.

(अ) पोट-कलम (१) मधील, खंड (ब) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(ब) राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे खानदेश प्रदेशातील दोन अशासकीय सदस्य. उपाध्यक्ष ;";

(ब) पोट-कलम (३) मध्ये, " सदस्याला " या मजकुराऐवजी " सदस्यांना " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ७ ची सुधारणा.

९. तापी पाटबंधारे महामंडळ अधिनियमाच्या कलम ७ मधील, पोट-कलम (२) ऐवजी पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(२) अध्यक्ष किंवा त्याच्या अनुपस्थितीत, कलम ४ चे पोट-कलम (१) याच्या खंड (ब) अन्वये नियुक्त करण्यात आलेले दोन्ही उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचे सदस्य असतील तर त्यांच्यापैकी, अध्यक्षाकडून आदेशाद्वारे पूर्वनिर्धारित करण्यात येईल असा उपाध्यक्ष, महामंडळाच्या बैठकीत अध्यक्ष म्हणून काम पाहील ; आणि ह्या तिघांच्याही अनुपस्थितीत, अन्य उपाध्यक्ष असलेला, शासनाचा मुख्य सचिव, अशा बैठकीचा अध्यक्ष म्हणून काम पाहील :

परंतु, खंड (ब) अन्वये नियुक्त करण्यात आलेले उपाध्यक्ष, जर राज्य विधानमंडळाच्या सदस्यांव्यतिरिक्त अन्य व्यक्ती असतील तर, उपाध्यक्ष म्हणून असलेला मुख्य सचिव, अध्यक्षाच्या अनुपस्थितीत बैठकीत अध्यक्ष म्हणून काम पाहील आणि मुख्य सचिवाच्या अनुपस्थितीत, अध्यक्षाकडून आदेशाद्वारे पूर्वनिर्धारित करण्यात येईल त्याप्रमाणे, दुसरा उपाध्यक्ष अशा बैठकीचा अध्यक्ष म्हणून काम पाहील .".

**१०.** तापी पाटबंधारे महामंडळ अधिनियम याच्या कलम ६५ मध्ये, समास टीपेसह येणाऱ्या, " उपाध्यक्ष " या मजकुराऐवजी, " तिन्ही उपाध्यक्ष " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ६५ ची सुधारणा.

## प्रकरण पाच

## संकीर्ण

२००१ चा महा. अध्या. २. **११.** विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ आणि महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ (सुधारणा व चालू ठेवणे) अध्यादेश, २००१ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. सन २००१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ याचे निरसन व व्यावृत्ती.

(२) अशा प्रकारे अध्यादेश निरसित करण्यात आला असला तरी, उक्त अध्यादेशाद्वारे केलेल्या कोणत्याही नामनिर्देशनासह, करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कोणतीही कार्यवाही ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ किंवा, यथास्थिती, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ किंवा महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ याच्या तदनुरूप तरतुदीं अन्वये करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

१९९७ चा महा. २६. १९९८ चा महा. ३. १९९८ चा महा. ४.

(5) MKVDC/VIDC/KIDC/TIDC/GMIDC amendment

असा. क्र. ११ रजिस्टर्ड नं. एमएच/एमबीआय-साऊथ/२०/२०००

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, जानेवारी ७, २०००/पौष १७, शके १९२१

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

### अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९.–महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम, १९९६, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७, महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ आणि महाराष्ट्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९८ यांत आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. | ३३–३६ |

दिनांक ६ जानेवारी २००० रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रतिमा उमरजी,**
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

## सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९.

(राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक ७ जानेवारी २००० रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम, १९९६, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७, महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ आणि महाराष्ट्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९८ यांत आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

१९९९ चा महा. अध्या. २१. **ज्याअर्थी**, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, दिनांक ८ ऑक्टोबर १९९९ रोजी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ आणि महाराष्ट्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ (सुधारणा) अध्यादेश, १९९९ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अध्यादेश " असा करण्यात आला आहे) प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** दिनांक २२ ऑक्टोबर १९९९ रोजी राज्य विधानमंडळाची पुन्हा सभा भरल्यानंतर, राज्य विधानमंडळाची सत्रसमाप्ती दिनांक २३ ऑक्टोबर १९९९ रोजी झाल्यामुळे उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणारे विधेयक महाराष्ट्र विधानसभेत वेळेअभावी प्रस्तुत करता आले नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (क) द्वारे, तरतूद केल्याप्रमाणे, उक्त अध्यादेश राज्य विधानमंडळाची पुन्हा सभा भरल्याच्या दिनांकापासून ज्या तारखेस सहा आठवड्यांचा कालावधी संपतो, त्या ३ डिसेंबर १९९९ या तारखेनंतर जारी असल्याचे बंद झाले असते ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाच्या तरतुदी कायद्याद्वारे, जारी असण्याचे चालू ठेवणे इष्ट आहे असे वाटते ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उक्त अध्यादेशाच्या तरतुदी जारी असण्याचे चालू ठेवण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, उक्त अध्यादेश मागे घेऊन व त्याचे निरसन करून, त्यांनी दिनांक २ डिसेंबर १९९९ रोजी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ आणि महाराष्ट्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ (सुधारणा व चालू ठेवणे) अध्यादेश, १९९९, भूतलक्षी प्रभावाने, म्हणजेच दिनांक ८ ऑक्टोबर १९९९ पासून प्रख्यापित केला ; १९९९ चा महा. अध्या. ३१.

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ आणि महाराष्ट्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ (सुधारणा व चालू ठेवणे) अध्यादेश, १९९९, याचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे. **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पन्नासाव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :— १९९९ चा महा. अध्या. ३१.

संक्षिप्त नाव व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ आणि महाराष्ट्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ (सुधारणा व चालू ठेवणे) अधिनियम, १९९९ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक ८ ऑक्टोबर १९९९ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

---

१९९६ चा महा. १५. २. महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम, १९९६ याच्या कलम १८ मधील, खंड (ब) मध्ये, पुढील मजकूर शेवटी जादा दाखल करण्यात येईल :— सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम १८ ची सुधारणा.

" , आणि शासनाच्या कृषि विभागामार्फत ठिबक सिंचन योजनांना मदत करणे ".

१९९७ चा महा. २६. ३. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ याच्या कलम १८ मधील, खंड (ब) मध्ये, पुढील मजकूर शेवटी जादा दाखल करण्यात येईल :— सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम १८ ची सुधारणा.

" , आणि शासनाच्या कृषि विभागामार्फत ठिबक सिंचन योजनांना मदत करणे ".

१९९८ चा महा. ३. ४. कोकण पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ याच्या कलम १८ मधील, खंड (ब) मध्ये, पुढील मजकूर शेवटी जादा दाखल करण्यात येईल :— सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १८ ची सुधारणा.

" , आणि शासनाच्या कृषि विभागामार्फत ठिबक सिंचन योजनांना मदत करणे ".

१९९८ चा महा. ४. ५. महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ याच्या कलम १८ मधील, खंड (ब) मध्ये, पुढील मजकूर शेवटी जादा दाखल करण्यात येईल :— सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम १८ ची सुधारणा.

" , आणि शासनाच्या कृषि विभागामार्फत ठिबक सिंचन योजनांना मदत करणे ".

१९९८ चा महा. २३. ६. महाराष्ट्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९८ याच्या कलम १८ मधील, खंड (ब) मध्ये, पुढील मजकूर शेवटी जादा दाखल करण्यात येईल :— सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ याच्या कलम १८ ची सुधारणा.

" , आणि शासनाच्या कृषि विभागामार्फत ठिबक सिंचन योजनांना मदत करणे ".

सन १९९९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३१ याचे निरसन व व्यावृत्ती.

७. (१) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ आणि महाराष्ट्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ (सुधारणा व चालू ठेवणे) अध्यादेश, १९९९, हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

१९९९ चा महा. अध्या. ३१.

(२) अशा प्रकारे उक्त अध्यादेश निरसित करण्यात आला असला तरीही, त्या अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम, १९९६, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७, महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ किंवा यथास्थिति, महाराष्ट्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९८ च्या तत्सम तरतुदींद्वारे, केलेली गोष्ट किंवा कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

१९९६ चा महा. १५. १९९७ चा महा. २६. १९९८ चा महा. ३. १९९८ चा महा. ४. १९९८ चा महा. २३.

VIPC/KIDC/

(6) amendment

असा. क्र. ११ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, एप्रिल १३, २००७/चैत्र २३, शके १९२९

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम

अनुक्रमणिका

पृष्ठे

**सन २००७चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८.—** विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ आणि कोकण पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम . . १४९-१५१

दिनांक १२ एप्रिल २००७ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक १३ एप्रिल २००७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ आणि कोकण पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.

१९९७ चा महा. २६. १९९८ चा महा. ३. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ आणि कोकण पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या अठ्ठावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—



[किंमत : रुपये ९.००]

## प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव. **१.** या अधिनियमास, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आणि कोकण पाटबंधारे विकास महामंडळ (सुधारणा) अधिनियम, २००७ असे म्हणावे.

## प्रकरण दोन

## विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ याची सुधारणा.

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम १५ ची सुधारणा. **२.** विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ याच्या कलम १५ मध्ये,— १९९७ चा महा. २६.

(क) खंड (अ) मध्ये, शेवटी आलेला " आणि " हा शब्द वगळण्यात येईल ;

(ख) खंड (अ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील :—

" (अ-१) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आणि कोकण पाटबंधारे विकास महामंडळ (सुधारणा) अधिनियम, २००७ अंमलात येण्याच्या दिनांकास, विदर्भ प्रदेशातील शासनाकडे निहीत असलेल्या सर्व सर्वेक्षणाधीन व अन्वेषणाधीन किंवा बांधकामाधीन पाटबंधारे प्रकल्पांमधील जंगम व स्थावर मालमत्तेचा समावेश असलेल्या मालमत्ता व मत्ता, त्यांच्या आस्थापनेसह, महामंडळाकडे निहीत होतील ; २००७ चा महा. ८.

(अ-२) शासनाच्या जलसंपदा विभागाकडून प्रशासकीय मान्यता देण्यात आलेले, तथापि, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आणि कोकण पाटबंधारे विकास महामंडळ (सुधारणा) अधिनियम, २००७ अंमलात येण्याच्या दिनांकापूर्वी, अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात न आलेले, असे विदर्भ प्रदेशातील सर्व पाटबंधारे प्रकल्प, महामंडळाकडे निहीत होतील ; आणि ". २००७ चा महा. ८.

## प्रकरण तीन

## कोकण पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ याची सुधारणा.

सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १५ ची सुधारणा. **३.** कोकण पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ याच्या कलम १५ मध्ये,— १९९८ चा महा. ३.

(क) खंड (अ) मध्ये, शेवटी आलेला " आणि " हा शब्द वगळण्यात येईल ;

(ख) खंड (अ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील :—

" (अ-१) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आणि कोकण पाटबंधारे विकास महामंडळ (सुधारणा) अधिनियम, २००७ अंमलात येण्याच्या दिनांकास, कोकण प्रदेशातील शासनाकडे निहीत असलेल्या सर्व सर्वेक्षणाधीन व अन्वेषणाधीन किंवा बांधकामाधीन पाटबंधारे प्रकल्पांमधील जंगम व स्थावर मालमत्तेचा समावेश असलेल्या मालमत्ता व मत्ता, त्यांच्या आस्थापनेसह, महामंडळाकडे निहीत होतील ; २००७ चा महा. ८.

(अ-२) शासनाच्या जलसंपदा विभागाकडून प्रशासकीय मान्यता देण्यात आलेले, तथापि, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आणि कोकण पाटबंधारे विकास महामंडळ (सुधारणा) अधिनियम, २००७ अंमलात येण्याच्या दिनांकापूर्वी, अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात न आलेले, असे कोकण प्रदेशातील सर्व पाटबंधारे प्रकल्प महामंडळाकडे निहीत होतील ; आणि ”.

२००७ चा महा. ८.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.